Let the mind manage the body
Que l'esprit gère le corps

**Index Number:** ..........................................................................

# NATIONAL CERTIFICATE OF EDUCATION

2023

## MARATHI (N640)

**TIME: 2 HOURS 15 MINUTES**

Candidates answer on the Question Paper.

---

**INSTRUCTIONS TO CANDIDATES**

1. Write your index number in the space provided above.
2. Write in dark blue or black ink.
3. Any rough working should be done in this booklet.
4. Answer **ALL** questions.
5. This document consists of **10** questions printed on **15** pages, numbered **2** to **16**.
6. The number of marks is given in brackets [ ] at the end of each question or part question.
7. The total of marks for this paper is **100**.

| For Examiners' use | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **Question No.** | **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **Total** | **Signature** |
| **Examiner** | | | | | | | | | | | | |
| **Team Leader** | | | | | | | | | | | | |
| **CE/ACE** | | | | | | | | | | | | |

© Mauritius Examinations Syndicate

Marks

**Question 1 (15 Marks)**

**प्रश्न १ला.**
**योग्य पर्यायाभोवती वर्तुळ काढा.**

१. आम्ही दररोज पायचेंडू ................................................................................. . [1]

**अ.** खेळतो **ब.** खेळेल

**क.** खेळ **ड.** खेळेन

२. मुसळधार ......................................................................रस्त्यांवर खूप पाणी साचले. [1]

**अ.** पावसामागे **ब.** पावसामुळे

**क.** पावसासाठी **ड.** पावसाआधी

३. मंगळवारी ................................................................................ शाळेच्या सहलीला गेली. [1]

**अ.** तो **ब.** ते

**क.** ती **ड.** तुम्ही

**४. कोणते वाक्य व्याकरणशुद्ध आहे?** [1]

**अ.** मागच्या वर्षी मनोज वाक्वा येथे राहत होता.

**ब.** आज वर्षी मनोज वाक्वा येथे राहत होता.

**क.** काल वर्षी मनोज वाक्वा येथे राहत होता.

**ड.** उद्या वर्षी मनोज वाक्वा येथे राहत होतो.

**५. कोणते वाक्य चांगले आहे?** [1]

**अ.** आमची शाळा तीन वाजता सुटले.

**ब.** आमचा शाळा तीन वाजता सुटते.

**क.** आमची शाळा तीन वाजता सुटते.

**ड.** आमचे शाळा तीन वाजता सुटला.



Please turn over

Marks

**६. कोणता प्रश्न बरोबर आहे?** [1]

**अ.** मॉरिशसमध्ये होळी साजरी करणार आहेत?

**ब.** मॉरिशसमध्ये होळी साजरी होतील?

**क.** मॉरिशसमध्ये होळी साजरी करतात का?

**ड.** मॉरिशसमध्ये होळी साजरी करतील?

**७. अधोरेखित शब्दाचे अनेकवचनी रूप लिहून वाक्य परत लिहा.** [1]

गवंडी घर बांधतो.

..................................................................................................................

**८. पुढील वाक्यात योग्य ठिकाणी स्वल्पविराम द्या.** [1]

आमच्या घरामागे आंबा पेरू फणस आणि पपई ही फळझाडे आहेत.

..................................................................................................................

**९. अधोरेखित नामांऐवजी योग्य सर्वनाम लिहा.** [1]

बाबा, आई आणि मी नाटक पाहायला गेलो. [ ] नाटक पाहायला गेलो.

**१०. खाली दिलेले वाक्य भविष्यकाळात लिहा.** [1]

आजी बाजारात जाते.

..................................................................................................................

**११. खालील शब्द योग्य क्रमाने लिहून अर्थपूर्ण वाक्य लिहा.** [1]

मदत जेवण केली नीताताईने तयार आईला करण्यास

..................................................................................................................

Marks

१२. आपल्या देशात १२ मार्चला सार्वजनिक सुट्टी असते. **(प्रश्नार्थी वाक्य करा)** [1]

..............................................................................................................................................................

१३. सकाळी आकाशात पक्षी उडत होते. **(नकारार्थी वाक्य करा)** [1]

..............................................................................................................................................................

**१४. अधोरेखित शब्दाचा पुलिंगी शब्द लिहून वाक्य परत लिहा.** [1]

काकूने गुलाबाची फुले आणली.

..............................................................................................................................................................

**१५. रिकाम्या जागी योग्य उभयान्वयी अव्यय लिहून वाक्य पूर्ण करा.** [1]

सुधाला बिस्किटे आवडतात ......................................................... आईने तिला चहाबरोबर मारी बिस्किटे दिली.

**अ.** कारण **ब.** पण

**क.** म्हणून **ड.** किंवा

| E |
|---|
| TL |
| CE |

Marks

**Question 2 (5 Marks)**

**प्रश्न २ रा. योग्य पर्यायाभोवती वर्तुळ काढा.**

**१.** रीना पावसात बाहेर जाऊ शकत नाही. ती तिची ........................................................ विसरली. [1]

**अ.** पुस्तक **ब.** ग्लास

**क.** पेन **ड.** छत्री

**२.** पेरू खराब झाला आहे. तो ................................................................ . [1]

**अ.** खा **ब.** शिजव

**क.** फेक **ड.** पी

**३.** ............................................................ आपल्याला पैसे काढले पाहिजेत. [1]

**अ.** रुग्णालयामधून **ब.** बँकेतून

**क.** दुकानातून **ड.** शाळेतून

**४.** कृपया, किती वाजले आहेत ते सांगाल का? माझे................................................ तुटले आहे. [1]

**अ.** घड्याळ **ब.** पिशवी

**क.** पर्स **ड.** खुर्ची

**५.** माझे आजोबा आजारी आहेत. त्यांना ............................................डॉक्टरकडे घेऊन जा. [1]

**अ.** अचानक **ब.** लगेच

**क.** कधीतरी **ड.** कधीच नाही

| E |
|---|
| TL |
| CE |

Marks

**Question 3 (10 Marks)**

**प्रश्न ३रा (अ). खालील उतारा  वाचा आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**माझा प्रिय मित्र**

माझ्या प्रिय मित्राचे नाव विनय आहे. तो दहा वर्षांचा आहे. तो प्रामाणिक आहे, म्हणून मला तो आवडतो. त्याला जेवण तयार करायला आवडते. जेव्हा मी त्याच्याकडे जातो, तेव्हा तो चवदार केक तयार करतो. मी विनयला ग्रेड १ पासून ओळखतो. आम्ही नेहमी एकाच वर्गात होतो. आम्हा दोघांनाही एकत्र फुटबॉल खेळायला आवडते.

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(१) माझ्या प्रिय मित्राचे नाव काय आहे?

..........................................................................................................

(२) तो मला का आवडतो?

..........................................................................................................

(३) त्याला काय करायला आवडते?

..........................................................................................................

(४) मी त्याला केव्हापासून ओळखतो?

..........................................................................................................

(५) आम्हाला एकत्र काय करण्यास आवडते?

..........................................................................................................

(5 marks)

| E |
|---|
| TL |
| CE |

Marks

**प्रश्न ३रा (ब). खालील संवाद वाचा आणि त्या खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**निता**: नमस्कार, श्याम तुला माहितच आहे की मला सीमाच्या वाढदिवसाला रविवारी बोलावले आहे.

ती पंधरा वर्षांची होईल. उद्या मी शहरात जाईन. तिच्यासाठी चांगली भेट विकत घेईन. तू माझ्याबरोबर शहरात येशील का? मी अकरा वाजता बस घेईन.

**श्याम**: नमस्कार, नीता. होय, मला तुझ्याबरोबर यायचे आहे. आपल्याकडे जर वेळ असेल तर आपण चित्रपट पाहायला जाऊ या. तुला बसस्थानकावर मी भेटेन.

१. नीता रविवारी कुठे जाणार आहे?

..........................................................................................................

२. नीता शहरात का जाणार आहे?

..........................................................................................................

३. नीता शहरात कशी जाणार आहे?

..........................................................................................................

४. नीता आणि श्याम यांना जर वेळ मिळाला तर ते कोठे जातील?

..........................................................................................................

५. नीता आणि श्याम अकरा वाजता कोठे भेटतील?

..........................................................................................................

(5 marks)

| |
|---|
| E |
| TL |
| CE |

Marks

**Question 4 (5 Marks)**

**प्रश्न ४था. खाली दिलेल्या उताऱ्यातील ठळक शब्दांचे योग्य रूप रिकाम्या जागी लिहा.**

दुपारची वेळ होती. उषा मावशी रेडिओवरची **(गाण)** **<u>गाणी</u>** ऐकत होती. एकाएकी रेडिओ बंद **(पडणे)** .................................................................. त्याच वेळी अचानक बाहेर **(जोर)**.................................................................. वारा वाहू लागला. थोड्या वेळाने रेडिओ परत सुरू झाला व रेडिओवर **(वादळ)** ..............................................................बातमी ऐकू आली. **(लोक )** ........................................................ सावध राहण्यास आणि आवश्यक काळजी घेण्यास **(सांगणे)** .............................................................. आले.

E | TL | CE

**Question 5 (5 Marks)**

**प्रश्न ५वा. खालील उताऱ्यात एकूण ५ चुका आहेत. एक उदाहरण दिलेले आहे. अधोरेखित शब्द सुधारून परत लिहा.**

उमेश सकाळी लवकर **<u>उठल</u>** **(उठला).** आज **<u>परीक्षेची</u>** (..........................................................................) पहिला दिवस होता. तो **<u>लगच</u>** (..........................................................................) तयार झाला. त्याने **<u>आईबाबांनी</u>** (..........................................................................) नमस्कार केला. आईने त्याला जेवणाची पिशवी **<u>दिला</u>** (..........................................................................). ती घेऊन उमेश **<u>शाळेचा</u>** (..........................................................................) दिशेने जाऊ लागला.

E | TL | CE

Marks

**Question 6A (5 Marks)**

**प्रश्न ६वा (अ). खाली दिलेले योग्य शब्द निवडून रिकाम्या जागी भरा. एक उदाहरण दिलेले आहे.**

| | | | |
|---|---|---|---|
| गरम | मैत्रिणीला | शाळा | वाईट |
| खेळतो | पलंगावर | ~~शिक्षिकेला~~ | |

आदित्याला शाळेला जाण्यास नेहमी उशीर होतो. त्याच्या **~~शिक्षिकेला~~** राग येतो. आदित्याला ..............................................................................वाटते.एक दिवस तो त्याच्या.................................................................................... मीनाला, नेहमी त्याला शाळेत येण्यास उशीर का होतो ते सांगतो. "मी सहा वाजता उठतो. बराच वेळ .......................................................................... लोळत असतो. मग मी दप्तर भरतो. कधीकधी मला माझे पेन आणि पट्टी सापडत नाही. मी सर्वत्र ते शोधतो. कधीकधी माझे दूध खूपच..............................................................................असते. ते पिण्याआधी मला थोडा वेळ थांबावे लागते. शाळेत जात असताना मला रेक्स आणि टॉमी हे दोन छोटे कुत्रे रस्त्यात भेटतात. मी थोडा वेळ त्यांच्याबरोबर............................................................................... मी शाळेत ८.३० वाजता पोहोचतो."

| E |
|---|
| TL |
| CE |

**Question 6B (5 Marks)**

**प्रश्न ६वा (ब). खालील रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून उतारा पूर्ण करा. मात्र या वेळेस तुम्हाला स्वतः शब्द शोधावा लागेल.**

मीना आदित्याची मदत करायचे ठरवते:

- "तू खूपच ............................................................................वाया घालवतोस. तुला तुझ्या सवयी बदलल्या पाहिजेत.
- लवकर झोप म्हणजे तू लवकर ...........................................................................
- ............................................................................ दप्तर रात्रीच तयार कर.
- तुझ्या आईला तुझ्यासाठी दूध लवकर तयार करायला सांग .
- घरी परतल्यावर कुत्र्यांबरोबर खेळ. ............................................................................ खेळू नकोस. जर तू माझे ............................................................................तर तू शाळेत वेळेवर पोहोचशील. बाईंना पण आनंद होईल."

| E |
|---|
| TL |
| CE |

Marks

**Question 7 (10 Marks)**

**प्रश्न ७ वा.**

तुमचा मित्र /तुमची मैत्रीण तुमच्यावर रागावला/रागावली आहे. तो/ती तुमच्याशी बोलत नाही. तुम्ही त्याला/तिला ५० ते ६० शब्दांचे पत्र लिहा.

खालील मुद्दे लेखनात येतील याची खात्री करा.

- तुमचा मित्र/तुमची मैत्रीण का रागावला/रागावली आहे?/ काय झाले?
- (तो/ती तुमच्याशी बोलत नाही ) तुम्हाला कसे वाटले?
- तुम्ही जे काही केले त्याबद्दल माफी मागा.
- तुम्ही परिस्थिती सुधारण्यासाठी आणि परत बोलणे सुरू करण्यासाठी काय कराल?

प्रिय ..........................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

..........................................................................................................................................................

तुझा विश्वासू मित्र/ तुझी विश्वासू मैत्रीण

..............................................................................................

| E |
|---|
| TL |
| CE |

**Question 8 (15 Marks)**
**पुढील उतारा वाचा.**

१. सई महाराष्ट्रातील रायगडची राजकन्या होती. त्या देशात समस्या होती. काही वर्षे तेथे पाऊस पडला नाही. नद्या आणि तलावातील पाणी सुकले होते.

२. त्यामुळे लोकांना अन्न आणि पाणी मिळत नव्हते. झाडे सुकू लागली आणि जनावरांना त्रास होऊ लागला होता. ती मरू लागली. राजकन्या सईचे वडील रायगडचे राजा होते. त्यांच्या मंत्र्यांसह आणि सल्लागारांसह यावर ते उपाय शोधू लागले. राजकन्या सईला तिच्या वडिलांसह बसून वेगवेगळया कल्पना ऐकावयास आवडत असे. राजकन्या सईसुद्धा यावर विचार करून उपाय शोधू लागली. तिला लोकांचे होणारे हाल पाहावत नव्हते.

३. राजकन्या सईला तिच्या वडिलांना तिच्या कल्पना सांगण्याची इच्छा होती. परंतु राजाला वाटे ती खूपच लहान आहे आणि तो तिचे ऐकत नसे. ती राणीकडे म्हणजेच तिच्या आईकडे गेली. राणीने तिचे म्हणणे ऐकले. सईला ती राजाबरोबर याबद्दल बोलेल असे तिने वचन दिले.

४. अखेरीस राजा ऐकून घेण्यास तयार झाला. राजकन्या सईने तिला सुचलेला उपाय राजाला, त्याच्या मंत्र्यांना आणि सल्लागारांना समजावून सांगितला. तिने सल्ला दिला की रायगडचे लोक पुढच्या वेळेस पावसाचे पाणी साठवू शकतील. पण यासाठी त्यांनी एक मोठा जलाशय खोदला पाहिजे.

५. राजा, त्याचे मंत्री आणि सल्लागार यांना तिचा उपाय खूपच आवडला. राजकन्येने रायगडच्या तरुणांना मदतीस घेतले. अशाप्रकारे सर्वांनी एकत्र येऊन मोठा जलाशय खोदला.

६. पुढच्या वेळेस जेव्हा मोठा पाऊस पडला तेव्हा सर्व पाणी जलाशयात साठले. साहजिकच माणसांसाठी, जनावरांसाठी आणि झाडांसाठी भरपूर पाणी होते. रायगडमधील पाण्याची समस्या सोडविल्याबद्दल सर्वांनी राजकन्या सईला भरपूर धन्यवाद दिले.

**Footnote**

Advisors/Ministers - सल्लागार / मंत्री

Problem - समस्या

Marks

**खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**From 1st paragraph**

१. देशात कोणती समस्या होती? [1]

..........

..........

**From 2nd paragraph**

२. समस्येमुळे होणाऱ्या दोन अडचणी सांगा? [2]

(i)..........

(i)..........

३. राजा समस्येवर उपाय शोधत आहे, हे आपल्याला कशावरून कळते? [1]

..........

..........

४. उताऱ्यातील कोणत्या वाक्यावरून राजकन्या सई दयाळू आहे हे समजते? [1]

..........

..........

५. राजकन्या सईला काय करण्यास आवडते? [1]

..........

..........

**From 3rd paragraph**

६. राजा राजकन्या सईचे का ऐकत नव्हता? [1]

..........

..........



Please turn over

Marks

**७.** राणीने राजकन्या सईला कोणते वचन दिले? [1]

........................................................................................................................

........................................................................................................................

**From 4th paragraph**

**८.** पाणी मिळविण्यासाठी राजकन्या सईने कोणता उपाय सुचवला? [1]

........................................................................................................................

........................................................................................................................

**From 5th paragraph**

**९.** राजकन्या सईचा उपाय ऐकताच राजाला,मंत्र्यांना आणि सल्लागारांना काय वाटले? [1]

........................................................................................................................

........................................................................................................................

**१०.** राजकन्या सईची या कामात कोणी मदत केली? [1]

........................................................................................................................

........................................................................................................................

**From 6th paragraph**

**११.** शेवटी कशामुळे देशात बदल आले? [1]

........................................................................................................................

........................................................................................................................

Marks

**१२. खालील शब्दांचा अर्थ लिहा.**

**अ)** वडील – ..........

**ब)** जलाशय – ..........

**क)** मोठा पाऊस – ..........

[3]

E | TL | CE

**Question 9A (5 Marks)**

**प्रश्न ९वा (अ). खाली दिलेल्या शब्दांचे मराठीत भाषांतर करा.**

i) to run: ..........

ii) garden: ..........

iii) elephant: ..........

iv) fear: ..........

v) now: ..........

E | TL | CE



Please turn over

Marks

**Question 9B (5 Marks)**

**प्रश्न ९वा (ब). खालील परिच्छेदाचे मराठीत भाषांतर करा.**

Mr Shyam is a good teacher. He comes on time in the classroom. Pupils listen to him attentively. They do all their homework. They all succeed in their examinations.

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

| E |
| --- |
| TL |
| CE |

Marks

**Question 10 (15 Marks)**

**खाली दिलेल्या विषयांपैकी <u>एका</u> विषयावर सुमारे <u>१५०</u> शब्दांचा निबंध लिहा.**

**१.** दुपारी तुम्ही घरी परत जाण्यासाठी जेव्हा शाळेची घंटा वाजते, तेव्हाचे तुमच्या शाळेचे वर्णन करा.

(तुम्हाला पुढील गोष्टींचे वर्णन करावे लागेल. जे काही तुम्ही पाहिले, जे काही तुम्ही ऐकले,विद्यार्थी कसे वागतात आणि वातावरण कसे आहे.)

**किंवा**

**२. खालील ओळीसहित गोष्ट लिहा.**

" मला अशी भेट मिळेल असे मला वाटले नव्हते."

Marks

| E |
|---|
| TL |
| CE |

**Blank Page**

Blank Page